SAMPLE CONTENT

Perfect

# राज्यशास्त्र

## इयत्ता बारावी (कला)

पाठ्यपुस्तक व बोर्डाच्या प्रश्नपत्रिका आराखड्यावर आधारित

१९९० च्या दशकात महिलांच्या समस्यांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात 'विकासा'ची जागा 'सक्षमीकरणाने' घेतली आणि १९९० मध्ये कायद्याद्वारे 'राष्ट्रीय महिला आयोगाची' स्थापना झाली. २००६ मध्ये भारत सरकारचे महिला आणि बालकल्याण विभाग, हे स्वतंत्र मंत्रालय म्हणून अस्तित्वात आले.



मेघना जाधव
M.A., M.Ed., SET (Edu., Geog.)

Published by:
LAZY BONE EDUCATION

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे निर्धारित नवीन पाठ्यपुस्तकावर आधारित.

PERFECT

# राज्यशास्त्र

## इयत्ता बारावी (कला)

### ठळक वैशिष्ट्ये

- नवीन पाठ्यपुस्तकावर आधारित
- संपूर्ण आशयाची मांडणी प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात
- विविध प्रकारच्या प्रश्नांचा समावेश
- 'पाठाची रूपरेषा' शीर्षकांतर्गत थोडक्यात पाठाचा आढावा
- 'ज्ञानगुरू' शीर्षकांतर्गत आशयासंबंधित अधिकची रुचीपूर्ण माहिती
- संकल्पनेची सुस्पष्टता 'आकलन हेतू स्पष्टीकरण' शीर्षकांतर्गत
- उत्तरे लक्षात ठेवण्यासाठी महत्त्वाचे मुद्दे व शब्द ठळक स्वरूपात, तसेच क्लृप्त्यांचा समावेश
- 'ज्ञानाचे उपयोजन' मध्ये पाठांतर्गत प्रश्नांचा समावेश
- पाठांतर्गत प्रश्न व उपक्रमांतर्गत विचारलेल्या प्रश्नांची बहुतांशी उत्तरे Q. R. Code द्वारे उपलब्ध
- प्रत्येक पाठाच्या शेवटी स्वयंमूल्यमापनाकरता सराव चाचणी (उत्तरे Q. R. Code द्वारे उपलब्ध)

Sample Content

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022 | **TEID: 2098** | P.O. No. 3233

## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाने तयार केलेल्या इयत्ता १२ वी राज्यशास्त्र पाठ्यपुस्तकामध्ये १९९१ नंतरच्या जागतिक घटनांचा आढावा, तसेच जागतिकीकरण संदर्भातील विविध संकल्पना यांचा भारतासंदर्भात ऊहापोह केला आहे. या पाठ्यक्रमाचे विश्लेषण करून तयार केलेले टार्गेट प्रकाशनाचे **Perfect राज्यशास्त्र इयत्ता बारावी (कला)** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

देशाचा एक भावी नागरिक म्हणून घडण्याच्या प्रक्रियेमध्ये देशाचे प्रशासन, त्यापुढील आव्हाने, जागतिक घटनांचा त्यावर होणारा परिणाम आणि उत्तम प्रशासनाकरता केले जाणारे उपाय या सर्व गोष्टी माहीत करून घेणे महत्त्वाचे आहे; किंबहुना आपल्या समाजाचा एक भाग म्हणून आपण आपल्या आणि पर्यायाने समाजाच्या विकासासाठी प्रशासनाकडे जागरूकतेने पाहतो. ही दृष्टी राज्यशास्त्राच्या अभ्यासाने निश्चितच येते. म्हणून, सदर पुस्तकातील प्रत्येक पाठाची सुरुवात ही 'पाठाची रूपरेषा' या शीर्षकांतर्गत पाठाचा आढावा देऊन करण्यात आली आहे. जेणेकरून पाठातील मुख्य मुद्दे व त्याअंतर्गत येणारे मुद्दे, संकल्पना विद्यार्थ्यांना लक्षात येतील. याशिवाय काही उत्तरांतर्गत आलेल्या संकल्पना विस्तारित स्वरूपात देण्यात आल्या आहेत. तसेच, आशयासंदर्भातील अधिकची रंजक माहिती 'ज्ञानगुरू' द्वारे पुरवण्याचा प्रयत्नही केला आहे. विषयाच्या ज्ञानाचे उपयोजन व्यावहारिक जीवनात करता यावे याकरता पाठांतर्गत प्रश्नांचा उत्तरांसहित समावेश केला आहे. यामुळे, राज्यशास्त्र विषयाची गोडी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होऊ शकेल. आपल्या करिअरच्या दृष्टीने राज्यशास्त्र विषयाचा विचार विद्यार्थ्यांना करता येईल. तसेच, विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षेच्या दृष्टीने तयारी होण्यास साहाय्यभूत ठरेल.

याबरोबरीनेच शिक्षणाला तंत्रज्ञानाची जोड देण्याच्या दृष्टीने काही संकल्पनांविषयकची माहिती, सराव चाचणीची उत्तरे Q. R. Code द्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर पुस्तक एका दृष्टिक्षेपात जाणता यावे याकरता पुस्तकाची वैशिष्ट्ये पुढील पानावर देण्यात आली आहेत.

हे पुस्तक परिपूर्ण होण्याकरता आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. पुस्तकाची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपल्या सूचना व प्रतिक्रिया स्वागतार्ह आहेत. आपला अभिप्राय पुढील इ-मेल पत्त्यावर पाठवू शकता.

इ-मेल आयडी mail@targetpublications.org

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on textbook 'राज्यशास्त्र: प्रथमावृत्ती: २०२०' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# वैशिष्ट्ये

**पाठाची रूपरेषा**
‘पाठाची रूपरेषा’ या शीर्षकांतर्गत पाठाचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

**विविध प्रश्नप्रकार अंतर्भूत**
संपूर्ण पाठ प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात देण्यात आला आहे. यामध्ये पाठ्युस्तकातील सर्व प्रश्नप्रकारांचा समावेश करण्यात आला आहे.

**आकलन हेतू स्पष्टीकरण**
विद्यार्थ्यांना प्रश्नांच्या उत्तरामागची मूळ संकल्पना व्यवस्थित समजून घेता यावी याकरता आवश्यक तेथे आकलन हेतू स्पष्टीकरण (उत्तराचा भाग नसलेले) देण्यात आले आहे.

**ज्ञानगुरू**
विद्यार्थ्यांना पाठातील आशयासंबंधित अधिकची रंजक माहिती ‘ज्ञानगुरू’ शीर्षकांतर्गत उपलब्ध करून दिली आहे.

**उत्तरांतील महत्त्वपूर्ण शब्द ठळक स्वरूपात**
दीर्घोत्तरी प्रश्नांच्या उत्तरांचे आकलन व स्मरण व्हावे याकरता उत्तरातील महत्त्वाचे शब्द ठळक केले आहेत. तसेच, मुद्द्यांच्या स्वरूपात उत्तरे दिली आहेत.

**क्लृप्ती**
दीर्घोत्तरी प्रश्नाचे उत्तर सहज स्मरणात राहावे याकरता उत्तराखाली आकृती स्वरूपात क्लृप्ती देण्यात आली आहे.

**Q. R. Code**
विद्यार्थ्यांना आशयासंबंधितची अधिक माहिती, तसेच ज्ञानाचे उपयोजन करा व उपक्रमांतर्गत बहुतांशी प्रश्नांची उत्तरे Q. R. Code द्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

**सराव चाचणी**
विद्यार्थ्यांना पाठासंदर्भात स्वयंमूल्यमापन करण्याच्या दृष्टीने पाठाच्या शेवटी सराव चाचणी देण्यात आली आहे आणि याची उत्तरे Q. R. Code द्वारे दिली आहेत.

Sample Content

## प्रश्नपत्रिका आराखडा

| प्रश्न क्र. | | प्रश्नाचे स्वरूप | विकल्प | गुण | विकल्पांसह गुण |
|---|---|---|---|---|---|
| १. | (अ) | कंसातील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. | - | ५ | ५ |
| | (ब) | खालीलपैकी गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा. | - | ३ | ३ |
| | (क) | दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा. | - | ४ | ४ |
| | (ड) | दिलेल्या विधानासाठी समर्पक संकल्पना लिहा. | - | ४ | ४ |
| | (इ) | गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा. | - | ४ | ४ |
| २. | (अ) | खालील संकल्पना चित्रे पूर्ण करा. | - | ४ | ४ |
| | (ब) | खालील नकाशाचे निरीक्षण करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा. | - | ५ | ५ |
| ३. | | खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा. (कोणतेही पाच) | ७ | १० | १४ |
| ४. | | खालील विधानांचा सहसंबंध स्पष्ट करा. (कोणतेही तीन) | ५ | ९ | १५ |
| ५. | | खालील विषयांवर तुमचे मत २५ ते ३० शब्दांत मांडा. (कोणतेही तीन) | ५ | १२ | २० |
| ६. | | खालील प्रश्नांची उत्तरे ८० ते १०० शब्दांत लिहा. (कोणतेही दोन) | ४ | १० | २० |
| ७. | | खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर दिलेल्या मुद्द्याच्या आधारे स्पष्ट करा सुमारे १५० ते २०० शब्दांत लिहा. | २ | १० | २० |
| | | **एकूण गुण** | | ८० | ११८ |

## अनुक्रमणिका


| घटक | घटकाचे नाव | गुण | विकल्पांसह गुण |
|---|---|---|---|
| १. | १९९१ नंतरचे जग | १९ | १ |
| २. | १९९१ नंतरच्या महत्त्वाच्या संकल्पना आणि समस्या: जागतिकीकरण | १९ | १५ |
| ३. | १९९१ नंतरच्या महत्त्वाच्या संकल्पना आणि समस्या: मानवतावादी प्रश्न | २० | २८ |
| ४. | समकालीन भारत: शांतता, स्थैर्य आणि राष्ट्रीय एकात्मतेसमोरील आव्हाने | २० | ४२ |
| ५. | समकालीन भारत: सुशासन | २० | ५७ |
| ६. | भारत आणि जग | २० | ६८ |


**टीप:** १. पाठाखालील स्वाध्यायांतर्गत दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.
२. पाठामध्ये चौकटीत दिलेल्या आशयासंबंधित प्रश्न # या चिन्हाने दर्शवले आहेत.

Sample Content

# १ १९९१ नंतरचे जग

## पाठाची रूपरेषा

### प्रस्तावना

१. जगभरात बहुध्रुवीयता उदयास येण्यास अनेक घटक कारणीभूत झाले.
२. नोव्हेंबर १९८९ साली बर्लिनची भिंत पडली आणि सोव्हिएट रशियाच्या विघटनास प्रारंभ होऊन अखेरीस शीतयुद्धाचा काळ समाप्त झाला.
३. शीतयुद्धोत्तर काळात पाच प्रमुख घटना/घडामोडी घडून आल्या. नव्या राष्ट्रांचा उदय, एकध्रुवीयतेचा उदय, मानवी हक्कांच्या जागरूकतेत वृद्धी आणि मानवतावादी दृष्टिकोनातून झालेल्या हस्तक्षेपांमध्ये वाढ, दहशतवाद, बहुध्रुवीयता आणि प्रादेशिकवाद या त्या घटना होत.

### शीतयुद्धाचा शेवट आणि नव्या राष्ट्रांचा उदय

१. १९८९ मधील पूर्व युरोपातील क्रांतीनंतर दोन महत्त्वाचे प्रवाह उदयास आले.
२. स्वयंनिर्णयांच्या हक्कांवर आधारित वांशिक राष्ट्रवादाच्या संकल्पनेचा आग्रह आणि द्विध्रुवीयतेचा अस्त हे ते दोन प्रवाह होत.
३. पूर्व युरोपीय राज्यांमधील क्रांती ही तेथील मध्यमवर्गाच्या वाढत्या अपेक्षांमधून निर्माण झाली होती.
४. सोव्हिएट रशियाच्या अंतर्गत राज्यांनी अधिक स्वायत्ततेचा आग्रह धरत कालांतराने स्वातंत्र्याची मागणी केली. परिणामी, अनेक नव्या राज्यांची निर्मिती झाली.

### एकध्रुवीय जागतिक व्यवस्थेचा उदय

१. १९९० मध्ये इराकने कुवेतवर आक्रमण करून कुवेतच्या भूप्रदेशावर ताबा मिळवला.
२. संयुक्त राष्ट्राने केलेल्या चर्चेच्या आधारे इराक विरुद्धच्या कारवाईत पुढाकार घेत अमेरिकेने एका बहुराष्ट्रीय सैन्याचे नेतृत्व केले. कुवेतची इराकच्या ताब्यातून सुटका होऊन या युद्धाची समाप्ती झाली.
३. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज.एच.बुश (सिनियर) यांच्या मते हा एक नैतिक विजय होता. या नव्या जागतिक परिस्थितीला 'New World Order' अशी संज्ञा वापरली गेली.
४. 'New World Order' ही एकध्रुवीय जागतिक व्यवस्थेची सुरुवात होती.
५. अमेरिका आता जगात एक प्रबळ राष्ट्र म्हणून प्रस्थापित झाले होते.
६. अमेरिकेच्या या वर्चस्वाला राजकीय आणि आर्थिक आयाम होते.

### मानवी हक्क आणि मानवतावादी हस्तक्षेप

**संयुक्त राष्ट्र शांतता रक्षक दलाची भूमिका**

| **काळ** | शीतयुद्धाचा शेवट | शीतयुद्धोत्तर काळ |
|---|---|---|
| **हस्तक्षेपाचे कारण** | राष्ट्रांचे विघटन आणि नव्या राष्ट्रांचा उदय या प्रक्रियेदरम्यान संघर्षाची किंवा युद्धाची परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याकरता हस्तक्षेप केला गेला. | युद्धजन्य परिस्थिती असणाऱ्या प्रदेशांत शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टिने आणि भविष्यातील संभाव्य युद्धांना आळा घालण्याकरता, शांतता प्रस्थापित करण्याकरता आणि पीडितांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करण्याकरता हस्तक्षेप केला गेला. |
| **यांना महत्त्व देण्यात आले.** | मानवी हक्क | 'मानवतावादी हस्तक्षेप' या संकल्पनेचा उदय |
| **हस्तक्षेप झालेली राष्ट्रे** | बोस्निया-हर्झेगोविना, चेचन्या, पूर्व तिमोर आणि एरिट्रीया | कंबोडिया, सोमालिया आणि युगोस्लाव्हिया |

### दहशतवाद

१. समाजात भीती निर्माण करून राजकीय, धार्मिक आणि वैचारिक उद्दिष्टे पूर्ण करण्याचा हेतूने चालवलेला हिंसाचार किंवा निर्माण केलेला धाक म्हणजे दहशतवाद होय.
२. पारंपरिक दहशतवाद व आधुनिक दहशतवाद असे दहशतवादाचे दोन प्रकार आहेत.

Sample Content

| | |
|---|---|
| | ३. पारंपरिक दहशतवादामध्ये मुख्यत: सरकारी संस्थांना लक्ष्य केले जाते आणि दहशतवादी कारवाया अनेकदा अलगतावादी (फुटीरतावादी) चळवळींशी संबंधित असतात.<br>४. आधुनिक दहशतवादामध्ये दहशतवादी संघटना अमूर्त स्वरूपाच्या धार्मिक विचारसरणीने प्रेरित झालेल्या असतात, त्यांचा लढा अमूर्त स्वरूपाची धार्मिक ध्येये साध्य करण्यासाठी असतो. |
| **बहुध्रुवीयता आणि प्रादेशिकवाद** | १. शीतयुद्धोत्तर काळात अमेरिकेच्या लष्करी आणि आर्थिक ताकदीला कोणीही आव्हान देऊ शकत नव्हते. त्यामुळे ती एकमेव महासत्ता म्हणून उदयास आली.<br>२. हार्ड पॉवर आणि सॉफ्ट पॉवर या दोहोंच्या एकत्रीकरणामुळे देश महासत्ता म्हणून जागतिक राजकारणात उदयाला येतो.<br>३. अमेरिकाप्रणित एकध्रुवीय जगास चीनने शक्तिशाली आव्हान दिलेले आहे.<br>४. रशिया हा शांघाय को-ऑपरेशन ऑर्गनायझेशनचा (SCO) संस्थापक सदस्य असल्यामुळे मध्य आणि पूर्व युरोपात रशियाचा बऱ्यापैकी प्रभाव कायम असल्याचे दिसते.<br>५. आजघडीला इंडो पॅसिफिक प्रदेशाचे महत्त्व वाढीस लागले आहे. |
| **शीतयुद्धोत्तर काळातील प्रादेशिकवाद** | १. प्रादेशिकवाद हा आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अभ्यासातील महत्त्वाचा विषय आहे.<br>२. एखादी प्रादेशिक संघटना निर्माण करण्यासाठी अथवा त्याचा भाग होण्यासाठी अनेक देश एकत्र येताना दिसतात.<br>३. प्रादेशिक संघटना बांधताना देशांनी भौगोलिकरित्या जोडलेले असणे महत्त्वाचे असतेच त्याशिवाय काही व्यावहारिक आणि संसाधनांसंदर्भातले मुद्देही महत्त्वाचे ठरतात.<br>४. काही प्रादेशिक संघटना, जसे ASEANC (१९६०), असोसिएशन ऑफ साऊथईस्ट एशियन नेशन्स् (१९६७) ने आर्थिक प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले, तर NATO सारख्या काही संघटनांनी संरक्षणाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले.<br>५. शीतयुद्धोत्तर काळात प्रादेशिक संघटनांनी व्यापारावरही लक्ष देण्यास सुरुवात केली.<br>६. दुसरे महायुद्ध व त्यानंतर शीतयुद्ध यांमुळे आलेल्या सततच्या अस्थिरतेमुळे युरोपीय देशांना युरोपीय समुदायाची स्थापना करण्याची प्रेरणा मिळाली.<br>७. निव्वळ आर्थिक संघटनांच्या दृष्टीने सुरू झालेली युरोपीय सहकार्याची प्रक्रिया विकसित होऊन आता हे संघटन हवामान बदल, पर्यावरण, आरोग्य, परराष्ट्र संबंध, सुरक्षा व स्थलांतर अशा विविध धोरण क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे.<br>८. सार्क (SAARC), बीम्सटेक (BIMSTEC), ब्रिक्स (BRICS), शांघाय सहकार्य संघटना (SCO) आणि जी-२० यांसारख्या इतर अनेक प्रादेशिक संघटना अस्तित्वात आल्या. |

### प्र.१.(अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. नोव्हेंबर १९८९ मध्ये बर्लिनची भिंत पडली आणि सोव्हिएट रशियाच्या विघटनाची सुरुवात होऊन अखेरीस हा काळ समाप्त झाला.

(अ) शीतयुद्धाचा (ब) पहिल्या महायुद्धाचा
(क) एकध्रुवीयतेचा (ड) यादवीचा

२. पूर्व-पश्चिम वाद खालीलपैकी कोणामधील वर्चस्वाच्या लढाईवर आधारित होता?

(अ) ब्रिटन आणि अमेरिका
(ब) अमेरिका आणि सोव्हिएट रशिया
(क) सोव्हिएट रशिया आणि चीन
(ड) ब्रिटन आणि जर्मनी

३. ११ सप्टेंबर २००१ ला अमेरिकेविरुद्ध झालेल्या हल्ल्यानंतर (ज्याला ९/११ हल्ला म्हणून ओळखले जाते) याचे स्वरूप बदलत गेले.

(अ) मुत्सद्देगिरीचे (ब) दहशतवादाचे
(क) राजकारणाचे (ड) आंतरराष्ट्रीय संबंधांचे

४. मानवी हक्कांबद्दलची वाढती जागरूकता आणि आंतरराष्ट्रीय कायद्यांमध्ये त्यांना मिळालेल्या पाठबळामुळे या हक्क संरक्षणाच्या नवीन संकल्पनेचा उदय झाला.

(अ) सॉफ्ट पॉवर
(ब) मानवतावादी हस्तक्षेप
(क) मानवी हक्क
(ड) हार्ड पॉवर

Sample content

*५. १९८९ नंतर आंतरराष्ट्रीय संबंधांमधील महत्त्वाचा प्रवाह
(अ) द्विध्रुवीयतेचा अस्त
(ब) आशियामध्ये प्रादेशिकवादाचा उदय
(क) अलिप्तवादाचा अंत
(ड) नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची मागणी

#६. 'इतिहासाचा अंत' हा सिद्धान्त मांडणारे अमेरिकन राजकीय भाष्यकार.
(अ) मेडिसीन्स सान्स (ब) जोसेफ नाय
(क) जॉर्ज एच. बुश (ड) फ्रान्सिस फुकुयामा

#७. अमेरिकन समाजशास्त्रज्ञ जोसेफ नाय यांनी सत्तेचे विभाजन या दोन प्रकारांत केले:
(अ) नवे जग आणि जुने जग
(ब) एकध्रुवीय आणि द्विध्रुवीय
(क) हार्ड आणि सॉफ्ट
(ड) चांगले आणि वाईट

#८. खालीलपैकी कोणती बाब संयुक्त राष्ट्रसंघाकडे स्वत:ची नसते?
(अ) संसद (ब) अधिकार क्षेत्र
(क) सैन्य (ड) मुख्यालय

#९. शस्त्रसंधी लागू असताना यांच्या शिफारसीनुसार संघर्षप्रवण किंवा युद्ध क्षेत्रांमध्ये शांतता रक्षक दलाला पाचारण केले जाते.
(अ) संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद
(ब) संयुक्त राष्ट्र सचिवालय
(क) युरोपीय परिषद
(ड) महासत्ता

#१०. 'दहशतवादविरोधी लढाई' या मोहिमेला या राष्ट्राचा पाठिंबा नव्हता.
(अ) ब्रिटन (ब) अफगाणिस्तान
(क) पोलंड (ड) तुर्कस्थान

११. दहशतवादी कारवायांचा अनेकदा यांच्याशी संबंध येतो.
(अ) अहिंसावादी चळवळी
(ब) अलगतावादी (फुटीरतावादी) चळवळी
(क) pan-India चळवळी
(ड) प्रादेशिकवाद

१२. या संघटना भौगोलिक तत्त्वांवर किंवा समान राजकीय, वैचारिक, आर्थिक इत्यादी घटकांवर आधारलेल्या असू शकतात.
(अ) धर्मनिरपेक्ष (ब) राष्ट्रीय
(क) प्रादेशिक (ड) आंतरराष्ट्रीय

#१३. जकात आणि कोटा हे याचे प्रमुख प्रकार आहेत.
(अ) व्यापारातील अडथळ्यांचे
(ब) धोरणांचे
(क) आर्थिक हितसंबंधांचे
(ड) विशेष करारांचे

*१४. 'मास्त्रीक्त' करार संदर्भ:
(अ) संयुक्त राष्ट्र शांतता रक्षक दल
(ब) युरोपीय संघ
(क) अमेरिकेचा कुवेतमध्ये हस्तक्षेप
(ड) ब्रिक्सची स्थापना

**उत्तरे:**
१. शीतयुद्धाचा
२. अमेरिका आणि सोव्हिएट रशिया
३. दहशतवादाचे
४. मानवतावादी हस्तक्षेप
५. द्विध्रुवीयतेचा अस्त
६. फ्रान्सिस फुकुयामा
७. हार्ड आणि सॉफ्ट
८. सैन्य
९. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद
१०. अफगाणिस्तान
११. अलगतावादी (फुटीरतावादी) चळवळी
१२. प्रादेशिक
१३. व्यापारातील अडथळ्यांचे
१४. युरोपीय संघ

**प्र.१. (ब) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.**

*१. जागतिक घडामोडींवर प्रभाव टाकण्याची व स्वत:चे हित साधण्याची क्षमता तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वाचे स्थान असलेले राज्य.

२. राष्ट्रीय सुरक्षेशी जोडून जागतिक पातळीवर अमेरिकन वर्चस्वाला आणि नेतृत्वाला सर्वमान्यता आहे या अर्थाची संज्ञा.

३. या व्यवस्थेच्या आधारे अमेरिकेने जागतिक व्यवस्थेवर अधिपत्य गाजवण्यास सुरुवात केली. या काळात अमेरिकेच्या लष्करी आणि आर्थिक ताकदीला कोणीही आव्हान देऊ शकत नव्हते.

*४. जेव्हा एक राज्य इतर राज्यांवर लष्करी ताकदीच्या वापराशिवाय प्रभाव पाडते.

#५. आंतरराष्ट्रीय संघर्षाची परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याकरता त्यात हस्तक्षेप करणारी संयुक्त राष्ट्राचे दल / सेना.

#६. सोव्हिएट रशियामध्ये साम्यवादाचा पाडाव झाल्यानंतर समाजवादी राजकीय, आर्थिक आणि सामाजिक व्यवस्थांचा अंत होऊन आता जगभरात उदारमतवादी लोकशाही व्यवस्था निर्माण होतील असा विश्वास निर्माण करणारा सिद्धान्त.

Sample Content

#७. प्रातिनिधिक लोकशाहीचा एक प्रकार.

८. समाजात भीती निर्माण करून राजकीय, धार्मिक आणि वैचारिक उद्दिष्टे पूर्ण करण्याच्या हेतूने चालवलेला हिंसाचार किंवा निर्माण केलेला धाक.

#९. अल-कायदा या संघटनेने घडवून आणलेल्या ९/११ च्या दहशतवादी हल्ल्यांचे प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज डब्ल्यू बुश यांनी आखलेली लष्करी मोहिम.

#१०. अनेक देश मिळून आपले आर्थिक हितसंबंध दृढ करण्याकरता काही विशेष करार करण्यासाठी याची स्थापना करतात.

#११. आयातीवरील कर.

#१२. आयातीच्या प्रमाणावर घातलेल्या मर्यादा.

१३. युरोपमध्ये युरोपीय कोळसा आणि पोलाद समुदाय (ECSC) आणि युरोपीय आर्थिक समुदाय या संघटना एकमेकांत विलीन होऊन हे म्हणून ओळखले गेले.

१४. हे युरोपीय संघामधील २८ पैकी १९ देशांचे अधिकृत चलन आहे.

१५. युरो या चलनाचा वापर करणाऱ्या देशांना एकत्रितपणे हे म्हणतात.

**उत्तरे:**

१. महासत्ता
२. नवीन जागतिक व्यवस्था
३. एकध्रुवीय आंतरराष्ट्रीय व्यवस्था
४. सॉफ्ट पॉवर
५. संयुक्त राष्ट्र शांतता रक्षक दल
६. इतिहासाचा अंत
७. उदारमतवादी लोकशाही
८. दहशतवाद
९. दहशतवादविरोधी लढाई
१०. व्यापारी गट
११. जकात
१२. कोटा
१३. युरोपीय समुदाय
१४. युरो (€)
१५. युरोझोन

## प्र.१. (क) गटात न बसणारा शब्द ओळखा.

१. चेक गणराज्य, स्लाव गणराज्य, बोस्निया, चेकोस्लोव्हाकिया.
२. माँटेनिग्रो, लिथूआनिया, जॉर्जिया, अॅझरबैजान, तुर्कमेनिस्तान.
३. स्लोवेनिया, सर्बिया, कझाकस्तान, उत्तर मेसिडोनिया.
४. सक्ती, सैनिकी बळ, आर्थिक निर्बंध, सांस्कृतिक प्रभाव.
५. सार्क, शांघाय सहकार्य संघटना, युरोझोन, बीम्सटेक.

**उत्तर:**

१. बोस्निया
२. माँटेनिग्रो
३. कझाकस्तान
४. सांस्कृतिक प्रभाव
५. युरोझोन

## प्र.१. (ड) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.

१.

| | | |
|---|---|---|
| i. | बर्लिनची भिंत | १९६९ |
| ii. | सोव्हिएट रशियाचे विघटन | १९९१ |
| iii. | पूर्व युरोपातील क्रांती | १९८९ |
| iv. | जागतिक मानवी हक्क परिषद | १९९३ |

२. संबंधित राज्यांपासून विघटन होऊन स्वतंत्र झालेली राष्ट्रे

| | | |
|---|---|---|
| i. | इंडोनेशिया | पूर्व तिमोर |
| ii. | इथियोपिया | क्रोएशिया |
| iii. | सुदान | दक्षिण सुदान |
| iv. | सोव्हिएट रशिया | किरगिझस्तान |

#३.

| | | |
|---|---|---|
| i. | अमेरिकेवरील दहशतवादी हल्ला | २००१ |
| ii. | इराक-कुवेत युद्ध | १९९० |
| iii. | अफगाणिस्तान युद्ध | २००१ |
| iv. | इराकमधील युद्ध | २००९ |

४. राज्ये आणि त्यांवरील दहशतवादी हल्ल्यांचे वर्ष

| | | |
|---|---|---|
| i. | बाली | २००१ |
| ii. | माद्रिद | २००४ |
| iii. | लंडन | २००५ |
| iv. | मुंबई | २००८ |

**उत्तर:**

१. **चुकीची जोडी:** बर्लिनची भिंत – १९६९
**दुरुस्त केलेली जोडी:** बर्लिनची भिंत – १९८९


२. **चुकीची जोडी:** इथियोपिया – क्रोएशिया
**दुरुस्त केलेली जोडी:** इथियोपिया – एरिट्रिया

३. **चुकीची जोडी:** इराकमधील युद्ध – २००९
**दुरुस्त केलेली जोडी:** इराकमधील युद्ध – २००३

४. **चुकीची जोडी:** बाली – २००१
**दुरुस्त केलेली जोडी:** बाली – २००२

## प्र.२. पुढील संकल्पनाचित्रे पूर्ण करा.

*१.




Sample Content

*२.



**उत्तरे:**

१. i. बांगलादेश ii. भूटान
iii. भारत iv. नेपाळ
v. श्रीलंका vi. म्यानमार
vii. थायलंड

२. i. चीन ii. रशिया
iii. कझाकस्तान iv. किरगिझस्तान
v. उझबेकिस्तान vi. ताजिकिस्तान

## प्र.३. खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.

**१. सोव्हिएट रशियाचे विघटन म्हणजे जगातील द्विध्रुवीयतेचा अस्त.**

**उत्तर:** बरोबर

**कारणे:**

i. दुसऱ्या महायुद्धानंतर, सत्तेच्या दोन केंद्रांमध्ये जग विभाजित झाले होते.

ii. दोन महासत्ता अस्तित्वात असल्यामुळे द्विध्रुवीयता अबाधित होती.

iii. अमेरिका आणि सोव्हिएट रशिया या दोन महासत्ता होत्या.

iv. सोव्हिएट रशियाच्या विघटनामुळे एक महासत्ता १९९१ मध्ये लोप पावली.

म्हणूनच, सोव्हिएट रशियाचे विघटन म्हणजे जगातील द्विध्रुवीयतेचा अस्त असे म्हटले जाते.

**२. पूर्व युरोपीय राज्यांमधील क्रांती ही तेथील मध्यमवर्गाच्या वाढत्या अपेक्षांमधून निर्माण झाली होती.**

**उत्तर:** बरोबर

**कारणे:**

i. पूर्व युरोपीय राज्यांची अधिक स्वातंत्र्य आणि आर्थिक स्थैर्य मिळावे अशी इच्छा होती.

ii. त्यांनी सोव्हिएटप्रणित साम्यवादी शासनाविरुद्ध उठाव केला आणि स्वतंत्र लोकशाही राज्ये उदयास आली.

iii. सोव्हिएट रशियाच्या अंतर्गत राजकीय आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठीदेखील चळवळी उदयास आल्याने वेगवेगळ्या राज्यांनी अधिक स्वायत्ततेसाठी आग्रह धरून कालांतराने स्वातंत्र्याची मागणी केली.

iv. यादरम्यान, विविध प्रदेशांतील लोकसमूहांच्या वांशिक अस्मिता प्रबळ होऊ लागल्याने वांशिक अस्मितेवर आधारित स्वतंत्र राष्ट्र निर्मितीच्या मागण्या होऊ लागल्या.

त्यामुळे, पूर्व युरोपीय राज्यांमधील क्रांती ही तेथील मध्यम वर्गाच्या वाढत्या अपेक्षांमधून निर्माण झाली होती.

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

शीतयुद्धाच्या काळात पूर्व युरोप हे पूर्व साम्यवादी राज्यांच्या गटाशी संबंधित होते. हा सांस्कृतिक भूप्रदेश ग्रीक, बायझँटाईन, पूर्व युरोपीय रूढीवादी चर्च परंपरा रशियन आणि काही तुर्की साम्राज्य सांस्कृतिक प्रभाव असलेले राज्य म्हणूनही ओळखले जात असे.

**#३. अमेरिकन समाजशास्त्रज्ञ जोसेफ नाय यांनी हार्ड पॉवर आणि सॉफ्ट पॉवर या दोन प्रकारांमध्ये साम्य शोधले.**

**उत्तर:** चूक

**कारणे:**

i. हार्डपॉवर म्हणजे 'अशी क्षमता जी दुसऱ्यांना त्यांच्या प्राधान्यक्रमाच्या आणि इच्छेच्या विरुद्ध वागण्यास भाग पडते.'

ii. यामध्ये धमकी आणि प्रलोभने दाखवून दुसऱ्यांवर सक्ती करणे यांचा अंतर्भाव होतो.

iii. याविरुद्ध सॉफ्ट पॉवर म्हणजे 'अशी क्षमता ज्यामुळे तुम्हांला हवे तेच दुसऱ्यांना हवेसे वाटेल.'

iv. अधिक स्पष्ट करायचे असल्यास, 'सक्तीपेक्षा आकर्षण, निर्माण करून स्वत:ची ध्येये साध्य करण्याची क्षमता' म्हणजे सॉफ्ट पॉवर होय.

अशाप्रकारे, अमेरिकन समाजशास्त्रज्ञ जोसेफ नाय यांनी हार्ड पॉवर आणि सॉफ्ट पॉवर या दोन प्रकारांमधील फरक शोधला.

***४. १९८० च्या दशकाला मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणतात.**

**उत्तर:** चूक

**कारणे:**

i. मानवी हक्कांबद्दलची वाढती जागरूकता आणि आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये त्यांना मिळालेल्या पाठबळामुळे 'मानवतावादी हस्तक्षेप' या हक्क संरक्षणाच्या नवीन संकल्पनेचा उदय झाला.

ii. शीतयुद्धोत्तर काळात संयुक्त राष्ट्रे युद्धजन्य परिस्थिती असणाऱ्या प्रदेशांत शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने हस्तक्षेप सुरू ठेवला.

iii. परंतु, येथे या हस्तक्षेपाचे उद्दिष्ट केवळ चालू असणारे युद्ध थांबवणे हे नसून भविष्यात अशा प्रकारच्या संभाव्य युद्धांना आळा घालणे, शांतता प्रस्थापित करणे आणि पीडितांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करणे हे आहे.

Sample Content

iv. १९९० पासून अनेक देशांनी मानवी हक्कांसंदर्भातील सहा मुख्य Conventions आणि करारांना मंजुरी दिली.

v. १७० हून अधिक देशांनी व्हिएन्ना येथे पार पडलेल्या १९९३ च्या जागतिक मानवी हक्क परिषदेत सहभाग नोंदवला. या परिषदेत त्यांनी मानवी हक्क संरक्षणाबाबत आपल्या जबाबदारीची पुन्हा एकदा पुष्टी केली.

vi. यानंतर संयुक्त राष्ट्रांचे मानवाधिकार उच्चायुक्तांचे कार्यालय अस्तित्वात आले. त्यांचे मुख्य कार्य संयुक्त राष्ट्रांच्या मानवी हक्कांशी निगडित कार्यक्रमांमध्ये समन्वय साधणे व मानवी हक्कांप्रति सार्वत्रिक आदर प्रस्थापित करणे होय.

vii. नव्वदीच्या दशकात मानवी हक्कांसंबंधीचे विचार प्रसारित करण्यात बिगर-सरकारी संस्थांनी महत्त्वाची भूमिका बजावली. यातील इंटरनॅशनल कमिटी ऑफ द रेड क्रॉस, मेडिसीन्स सान्स फ्रंटीयर आणि ऑक्सफॅम या संस्था थेट युद्धक्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत.

viii. या संस्था मानवी हक्कांबाबत मोहीम राबवून मानवी हक्क करार, मानवतावादी कायद्याचे पालन यांचा प्रसार करतात.

म्हणून, १९८० च्या दशकाला नव्हे, तर १९९० च्या दशकाला मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणतात.

**५. चीनने जगात प्रबळ स्थान प्राप्त केले.**

**उत्तर:** बरोबर

**कारणे:**

i. अमेरिकाप्रणित एकध्रुवीय जगास चीनने शक्तिशाली आव्हान दिले.

ii. १९७० च्या मध्यात डेंग शाओपिंग यांच्या नेतृत्वाखाली चीनने उदारीकरणाचे धोरण स्वीकारून आर्थिक प्रगती साध्य केली आणि चीनने जगात प्रबळ स्थान प्राप्त केले. १९९० मध्ये आणखी नाट्यमय घटना घडल्या.

iii. चीनने One Belt One Road आणि चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडोर यांसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्यास सुरुवात करून आपले प्रभावक्षेत्र निर्माण केले. मध्य आशिया आणि पूर्व आशिया या प्रदेशांवर वर्चस्व गाजवण्यास सुरुवात केली.

iv. आफ्रिकेतदेखील प्रवेश करून शेजारी देशांपलीकडे प्रभाव पाडण्याची आकांक्षा दाखवली.

v. दक्षिण चिनी सागरावर आपला हक्क सांगण्याकरता चीन आपले नौदल व वायुसेना भक्कमपणे उभारत आहे.

यावरून, असे म्हणता येते, की चीनने जगात प्रबळ स्थान प्राप्त केले आहे.

**६. आजघडीला इंडो पॅसिफिक प्रदेशांचे महत्त्व घडू लागले आहे.**

**उत्तर:** चूक

**कारणे:**

i. चीन आणि भारतासारख्या देशांमुळे झालेल्या आर्थिक वृद्धीमुळे इंडो पॅसिफिक प्रदेशांचे महत्त्व आणखी वाढीस लागले आहे.

ii. त्याचबरोबर दक्षिण चीन महासागरातील संघर्ष आणि ASEAN चे वाढलेले महत्त्व हीदेखील याकरता कारणीभूत आहेत.

iii. पॅसिफिक प्रदेशात अमेरिकेला असणारा रस यांमुळे या प्रदेशाचे महत्त्व आणखी वाढीस लागले आहे.

iv. भविष्यात भारताची या प्रदेशामध्ये महत्त्वाची भूमिका असेल.

वरील सर्व कारणांमुळे आजघडीला इंडो पॅसिफिक प्रदेशांचे महत्त्व वाढीस लागले आहे.

***७. 'मास्त्रीक्त करार' युरोपच्या संरक्षणासाठी करण्यात आला.**

**उत्तर:** चूक

**कारणे:**

i. ७ फेब्रुवारी १९९२ रोजी 'मास्त्रीक्त' करार अंमलात येऊन युरोपीय संघाची स्थापना झाली.

ii. या करारामुळे सहकार्याचा परीघ वाढला आणि त्यात अंतर्गत व्यवहार, न्यायालयीन बाबी, परराष्ट्र आणि संरक्षक धोरणांचा समावेश झाला.

iii. या करारातून आर्थिक पातळीवर एकीकरण होऊन 'युरो' या समान चलनाचा उदय झाला.

iv. युरो (€) हे युरोपीय संघामधील २८ पैकी १९ देशांचे अधिकृत चलन आहे. या देशांना एकत्रितपणे 'युरोझोन' म्हणून ओळखले जाते.

यावरून असे म्हणता येते, की मास्त्रीक्त करार युरोपीय संघाची निर्मिती करण्याकरता करण्यात आला.

**ज्ञानगुरू**



अमेरिकन चलन हे जगातील विनिमयाचे मजबूत दर असणारे चलन बनले, तर युरो हे काही वेळा डॉलरपेक्षा अधिक मजबूत होते. युरोच्या मूल्यांमधील सातत्याने होणारे चढउतार हे चलन अस्थिर असल्याचे सूचित करते. फेब्रुवारी २०२० मध्ये, १०० युरोंचे मूल्य हे साधारणत: १०८.४९७ यु. एस. डॉलर इतके होते.

Sample Content

***८. दक्षिण आशियातील व्यापारासाठी सार्क महत्त्वाचे आहे.**

**उत्तर:** बरोबर

**कारणे:**

i. १९८५ मध्ये ढाका येथे सार्कची स्थापना करण्यात आली.

ii. प्रारंभीच्या काळात सार्कमध्ये भारत, बांगलादेश, पाकिस्तान, नेपाळ, भूटान, श्रीलंका व मालदीव असे सात देश सदस्य होते. २००७ मध्ये अफगाणिस्तानचा आठवा सदस्य म्हणून समावेश केला गेला.

iii. चीन, अमेरिका, युरोपीय महासंघ यांच्यासह ९ देश व संघटनांना सार्कमध्ये 'निरीक्षक दर्जा' बहाल करण्यात आला आहे. दक्षिण आशियामध्ये संवाद निर्माण करण्यासाठी सार्कची निर्मिती करण्यात आली.

iv. या अनुषंगाने दक्षिण आशियाई प्राधान्य व्यापार करार (SAPTA) १९९३ साली अस्तित्वात आला.

v. पुढे दक्षिण आशियाई मुक्त व्यापार क्षेत्र (SAFTA) ही सार्कची मुक्त व्यापार व्यवस्था २००६ मध्ये एका करारामुळे कार्यान्वित झाली. ज्यामुळे १९९३ ची सार्क प्राधान्य व्यापार व्यवस्था संपुष्टात आली.

म्हणूनच, दक्षिण आशियातील व्यापारासाठी सार्क महत्त्वाचे आहे.

## प्र.४. सहसंबंध स्पष्ट करा.

**१. पारंपरिक दहशतवाद आणि आधुनिक दहशतवाद**

**उत्तर:**

i. पारंपरिक दहशतवादी कारवायांचा अनेकदा अलगतावादी (फुटीरतावादी) चळवळींशी संबंध येतो. पारंपरिक दहशतवाद हा मुख्यत: सरकारी संस्थांना लक्ष्य करत असे.

ii. आधुनिक दहशतवादी संघटना अमूर्त स्वरूपाच्या धार्मिक विचारसरणीने प्रेरित झालेल्या असतात. त्यांचा लढा अमूर्त स्वरूपाची धार्मिक ध्येये साध्य करण्यासाठी असतो. त्यासाठी वैश्विक पातळीवर योजना राबवल्या जातात.

iii. पारंपरिक दहशतवादी सहसा काही विशिष्ट लोकसमूहांच्या हक्कांसाठी लढत असत. आज आधुनिक दहशतवादी मात्र विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील विशिष्ट लोक समूहांसाठी लढत नाहीत.

iv. पारंपरिक दहशतवाद साधारणपणे सरकारी संस्था आणि अधिकारी यांना प्रामुख्याने लक्ष करत. आधुनिक दहशतवादी संघटना विमान अपहरणे, बॉम्बस्फोट आणि राजकीय नेत्यांची हत्या अशा मार्गांचा अवलंब करत सर्वसमान्य माणसांनाही लक्ष्य करतात.

**२. प्रादेशिकवाद आणि बहुध्रुवीयता**

**उत्तर:**

i. प्रादेशिकवादाचा प्रवास साधारणत: त्यातील सदस्यांमध्ये घडणाऱ्या राजकीय संवादाने सुरू होतो. ही चर्चा पुढे नेण्यासाठी समान विचारसरणी किंवा आर्थिक हितसंबंध उपयोगास येऊ शकतात. या चर्चेचा परिपाक म्हणजे एखाद्या प्रादेशिक संघटनेची निर्मिती होणे होय.

ii. रशिया, चीन आणि भारताचा उदय आणि इंडो पॅसिफिक प्रदेशाचे वाढते महत्त्व या बहुध्रुवीयतेच्या खुणा होत्या.

iii. १९९१ नंतरच्या काळात प्रदेश आणि प्रादेशिक संघटना अधिक महत्त्वाच्या बनू लागल्या.

iv. युरोपिअन युनियन (EU) मार्फत युरोपात आर्थिक आणि प्रादेशिक एकीकरण झालेले दिसते. चीन आणि जपान व त्यापाठोपाठ भारतामुळे जागतिक व्यवस्थेत आशियाचा प्रभाव वाढलेला दिसतो, रशियाचे लष्करी शक्ती म्हणून झालेले पुनरुत्थान आणि नव्या प्रादेशिक संघटनांचे वाढते महत्त्व यांमुळे एकध्रुवीय जागतिक व्यवस्थेचे बहुध्रुवीय व्यवस्थेत रूपांतर झाले.

## प्र.५. आपले मत नोंदवा.

**१. १९८९ मधील पूर्व युरोपातील क्रांतीनंतर आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये नव्या प्रवाहांना जन्म दिला.**

**उत्तर:**

i. १९८९ मधील पूर्व युरोपातील क्रांतीनंतर आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये दोन महत्त्वाचे प्रवाह आढळतात.

ii. पहिला म्हणजे स्वयंनिर्णयांच्या हक्कांवर आधारित वांशिक राष्ट्रवादाच्या संकल्पनेचा आग्रह आणि दुसरा म्हणजे द्विध्रुवीयतेचा अस्त.

iii. अमेरिका आणि सोव्हिएट रशिया या दोन महासत्ता अस्तित्वात असल्यामुळे द्विध्रुवीयता अबाधित होती.

iv. सत्तेच्या या दोन केंद्रांमध्ये जग विभाजित झाले होते. सोव्हिएट रशियाच्या विघटनामुळे एक महासत्ता लोप पावली. त्यामुळे, सोव्हिएट रशियाचे विघटन झाले आणि जगात द्विध्रुवीयता नष्ट झाली.

**#२. उदारमतवादी लोकशाही हा प्रातिनिधिक लोकशाहीचाच एक प्रकार आहे.**

**उत्तर:**

i. प्रातिनिधिक लोकशाही म्हणजे, लोकांनी आणि त्यांच्या प्रतिनिधींनी तयार केलेले सरकार होय.

ii. लोकशाहीप्रमाणेच उदारमतवादी लोकशाहीचीही सार्वत्रिक मताधिकार, स्वतंत्र आणि न्याय्य निवडणुका, स्पर्धात्मक पक्षीय राजकारण आणि कायद्याचे राज्य अशी काही ठळक वैशिष्ट्ये आहेत.

iii. उदारमतवादी लोकशाहीमध्ये वैयक्तिक स्वातंत्र्याला महत्त्वाचे स्थान आहे. जागतिक स्तरावर आज उदारमतवादी लोकशाही ही एक प्रबळ राजकीय विचारधारा आहे.

***३. मानवतावादी हस्तक्षेप**

**उत्तर:**

i. मानवी हक्कांबद्दलची वाढती जागरूकता आणि आंतरराष्ट्रीय कायद्यामध्ये त्यांना मिळालेल्या पाठबळामुळे 'मानवतावादी हस्तक्षेप' या हक्क संरक्षणाच्या नवीन संकल्पनेचा उदय झाला.

ii. १९९० चे दशक हे मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणावा लागेल.

iii. १९९० पासून अनेक देशांनी मानवी हक्कांसंदर्भातील सहा मुख्य Conventions आणि करारांना मंजुरी दिली.

iv. शीतयुद्धोत्तर काळात संयुक्त राष्ट्रांनी युद्धजन्य परिस्थिती असणाऱ्या प्रदेशांत शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने हस्तक्षेप सुरू ठेवला.

v. या हस्तक्षेपाचे उद्दिष्ट केवळ चालू असणारे युद्ध थांबवणे हे नसून भविष्यात अशा प्रकारच्या संभाव्य युद्धांना आळा घालणे, शांतता प्रस्थापित करणे आणि पीडितांच्या मानवी हक्कांचे संरक्षण करणे हे आहे.

vi. याच कारणांसाठी संयुक्त राष्ट्राने कंबोडिया, सोमालिया आणि युगोस्लाव्हिया या देशांमध्ये हस्तक्षेप केला.

**४. रशिया ऊर्जास्रोतांची महासत्ता म्हणून उदयास आली आहे.**

**उत्तर:**

i. रशियाने तेल आणि वायुनिर्मितीच्या क्षेत्रात मोठी प्रगती केलेली आहे.

ii. हल्लीच्या काळात तेथे आर्थिक स्थैर्यामुळे राष्ट्रनिष्ठा जागृत होऊन लष्कराचा प्रभाव वाढलेला दिसतो.

iii. रशिया हा शांघाय सहकार्य संघटनेचा (SCO) संस्थापक सदस्य असल्यामुळे मध्य आणि पूर्व युरोपात रशियाचा बऱ्यापैकी प्रभाव कायम आहे असे दिसते.

***५. आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रादेशिकवाद**

**उत्तर:**

i. प्रादेशिकवाद हा आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अभ्यासातील महत्त्वाचा विषय आहे. एखादी प्रादेशिक संघटना निर्माण करण्यासाठी अथवा त्याचा भाग होण्यासाठी अनेक देश एकत्र येताना दिसतात.

ii. या संघटना भौगोलिक तत्त्वांवर किंवा समान राजकीय, वैचारिक, आर्थिक इत्यादी घटकांवर आधारलेल्या असू शकतात.

iii. प्रादेशिक संघटना बांधताना देशांनी भौगोलिकरित्या जोडलेले असणे महत्त्वाचे असतेच त्याशिवाय काही व्यावहारिक आणि संसाधनांसंदर्भातले मुद्देही महत्त्वाचे ठरतात. यामध्ये दळणवळण आणि संपर्क व्यवस्था, ऊर्जास्रोत, आरोग्य व्यवस्था इत्यादींचा समावेश होतो.

iv. प्रादेशिकवादाचा प्रवास साधारणत: त्यातील सदस्यांमध्ये घडणाऱ्या राजकीय संवादाने सुरू होतो. ही चर्चा पुढे नेण्यासाठी समान विचारसरणी किंवा आर्थिक हितसंबंध उपयोगास येऊ शकतात. या चर्चेचा परिपाक म्हणजे एखाद्या प्रादेशिक संघटनेची निर्मिती होणे होय.

v. १९४० आणि १९५० च्या दरम्यान आशिया आणि आफ्रिकेतील प्रादेशिकवादाने येथील देशांमधल्या राजकीय चर्चांवर लक्ष केंद्रित केले होते. युरोपचे लक्ष मात्र आर्थिक समन्वयाकडे होते. उदा. युरोपमध्ये युरोपीय कोळसा आणि पोलाद समुदाय (ECSC, १९५१) युरोपीय आर्थिक समुदाय (EEC, १९५७) आणि युरोपीय अणुऊर्जा समुदाय (Euratum, १९५८) या संघटना स्थापन झाल्या.

vi. १९६० च्या सुमारास प्रादेशिक सहकार्याच्या संकल्पनेचा आशियामध्ये प्रसार झाला. १९६७ मध्ये ASEAN ची स्थापना झाली. १९६० मध्ये आर्थिक निकषांवर आधारलेल्या प्रादेशिक संघटना उदयास आल्या. NATO सारख्या काही संघटनांनी संरक्षणाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले.

vii. शीतयुद्धोत्तर काळात युरोपीय संघासारख्या प्रादेशिक संघटनांनी व्यापारावरही लक्ष देण्यास सुरुवात केली.

**#६. युरो हे युरोझोनचे अधिकृत चलन आहे.**

**उत्तर:**

i. १ जानेवारी १९९९ साली जगातील चलनांच्या बाजारात युरोचा प्रवेश झाला.

ii. ब्रिटन, स्वीडन आणि डेन्मार्क यांचा अपवाद वगळता युरोपीय संघाच्या सगळ्या देशांमध्ये युरोचा चलन म्हणून वापर सुरू झाला.

iii. युरोपीय संघातील युरो हे राष्ट्रीय चलन म्हणून स्वीकारलेल्या देशांच्या भौगोलिक आणि आर्थिक प्रदेशास युरोझोन म्हणून संबोधतात.

## प्र.६. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

**१. 'वांशिक अस्मितेवर आधारित स्वतंत्र राष्ट्र निर्मितीच्या मागण्यांतून नव्या राष्ट्रांचा उदय झाला' हे स्पष्ट करा.**

**उत्तर:**

i. विविध प्रदेशांतील लोकसमूहांच्या वांशिक अस्मिता प्रबळ होऊ लागल्या. त्यामुळे वांशिक अस्मितेवर आधारित स्वतंत्र राष्ट्र निर्मितीच्या मागण्या होऊ लागल्या.

ii. युरोपमध्ये चेकोस्लोव्हाकियाचे 'चेक गणराज्य' आणि 'स्लाव गणराज्य' या दोन राष्ट्रांमध्ये विभाजन झाले.

Sample Content

iii. युगोस्लाव्हियाचे विघटन होऊन क्रोएशिया, स्लोवेनिया, सर्बिया, बोस्निया आणि हर्झेगोविना, उत्तर मेसिडोनिया, मॉंटेनिग्रो ही राष्ट्रे उदयास आली.

iv. सोव्हिएट रशियाच्या अंतर्गत येणाऱ्या राज्यांनी अधिक स्वायत्ततेसाठी आग्रह धरून कालांतराने स्वातंत्र्याची मागणी केली.

v. सोव्हिएट रशियाच्या विघटनातून काही नवी राष्ट्रे अस्तित्वात आली ती पुढीलप्रमाणे: आर्मेनिया, मॉल्डोव्हा, एस्टोनिया, लाटव्हिया, लिथूआनिया, जॉर्जिया, अॅझरबैजान, ताजिकिस्तान, किरगिझस्तान, बेलारुस, उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान, युक्रेन, कझाकस्तान आणि रशिया.

vi. स्वशासनाच्या हक्कावर आधारलेल्या वांशिक राष्ट्रवादाला अनुसरून नव्या राज्यांच्या निर्मितीचा प्रवाह जगाच्या इतर भागांमध्येही दिसून आला.

vii. काही नवे देश स्वतंत्र राज्य म्हणून उदयास आले. ते पुढीलप्रमाणे: पूर्व तिमोर (इंडोनेशियापासून स्वातंत्र्य), एरिट्रिया (इथियोपियापासून स्वातंत्र्य), दक्षिण सुदान (सुदानपासून स्वातंत्र्य).

viii. याशिवाय कॅटलोनियाला स्पेनपासून स्वातंत्र्य हवे आहे. कोसोवोला सर्बियापासून स्वातंत्र्य हवे आहे. युरोपातील काही देशांनी कोसोवोचा स्वतंत्र देशाचा दर्जा मान्य केला आहे. चेचन्याला रशियापासून स्वातंत्र्य हवे आहे. अशा वांशिक राष्ट्रवादावर आधारित स्वातंत्र्याच्या मागण्या आजही होत आहेत.

**२. 'New World Order' ही संज्ञा आणि तिचा जागतिक पातळीवरील राजकारणावर पडलेला प्रभाव स्पष्ट करा.**

**उत्तर:**

**i. संयुक्त राष्ट्रांनी घेतलेली दखल:** १९९० मध्ये इराकने कुवेतवर आक्रमण करून कुवेतच्या भूप्रदेशावर ताबा मिळवला. याचे पडसाद जागतिक स्तरावर उमटले. संयुक्त राष्ट्रांनी या प्रकरणाची दखल घेत त्यावर चर्चा केली.

**ii. अमेरिकेचा पुढाकार:** अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज एच. बुश (सिनियर) यांनी इराक विरुद्धच्या कारवाईत पुढाकार घेत एका बहुराष्ट्रीय सैन्याचे नेतृत्व केले. कुवेतची इराकच्या ताब्यातून सुटका होऊन या युद्धाचा अंत झाला.

**iii. जागतिक राजकारणावरील परिणाम:** अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष जॉर्ज एच.बुश (सिनियर) यांच्या मते हा एक नैतिक विजय होता. या नव्या जागतिक परिस्थितीला 'New World Order' अशी संज्ञा वापरली.

**iv. अमेरिकेला पाठिंबा:** अमेरिकेच्या या कृतीला जागतिक पातळीवर पाठिंबा मिळाला. यात सोव्हिएट रशिया, चीन, नाटोमधील सहभागी देश, इस्राएल आणि अरब देशांमध्ये सौदी अरेबियाचादेखील समावेश होता.

**v. रशिया सत्तास्पर्धेतून बाहेर:** अंतर्गत समस्यांनी ग्रासलेल्या सोव्हिएट रशियाचे १९९१ मध्ये विघटन झाले आणि ती महासत्ता राहिली नाही. त्यामुळे, अमेरिकेसमोर फारसे वैचारिक आव्हान उरले नव्हते.

**vi. अमेरिकेचे नेतृत्व:** कालांतराने 'नवीन जागतिक व्यवस्था' या संज्ञेचा अर्थ राष्ट्रीय सुरक्षेशी जोडून जागतिक पातळीवर अमेरिकन वर्चस्वाला आणि नेतृत्वाला सर्वमान्यता आहे असा घेण्यात आला.

**vii. एकध्रुवीय जागतिक व्यवस्थेचा प्रारंभ:** एकध्रुवीय जागतिक व्यवस्थेची ही पहिलीच अभिव्यक्ती होती. अमेरिका आता जगात एक प्रबळ राष्ट्र म्हणून प्रस्थापित झाले होते.

**viii. वास्तविक परिणाम:** अमेरिकेच्या या वर्चस्वाला राजकीय आणि आर्थिक आयाम होते. राजकीयदृष्ट्या, पूर्व युरोपातील अनेक पूर्वाश्रमीच्या साम्यवादी राजवटींनी अमेरिकी उदारमतवादीलोकशाही तत्त्वांवर आधारलेली शासनप्रणाली स्वीकारली. सुशासनाची संकल्पनासुद्धा लोकशाहीशी जोडली गेली. आर्थिक क्षेत्रातदेखील बऱ्याच देशांनी समाजवादी अर्थव्यवस्थेचा त्याग केला.

***३. सॉफ्ट पॉवर म्हणजे काय ते उदाहरणासह स्पष्ट करा.**

**उत्तर:**

i. अमेरिकन समाजशास्त्रज्ञ जोसेफ नाय यांनी सॉफ्ट पॉवर म्हणजे काय हे सांगताना म्हटले आहे, की 'सक्तीपेक्षा आकर्षण निर्माण करून स्वत:ची ध्येये साध्य करण्याची क्षमता' म्हणजे सॉफ्ट पॉवर होय.

ii. सॉफ्ट पॉवर म्हणजे अशी क्षमता ज्यामुळे तुम्हांला हवे तेच दुसऱ्यांना हवेसे वाटेल.

iii. सैनिकी बळाचा वापर न करता दुसऱ्या देशांवर प्रभाव टाकणे म्हणजे सॉफ्ट पॉवर.

iv. हा प्रभाव पाडण्यासाठी आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि इतर साधनांचा वापर केला जातो.

v. अमेरिकन वर्चस्वाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे तिची सॉफ्ट पॉवर.

vi. अमेरिकन सॉफ्ट पॉवरची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे:

**अ. शैक्षणिक देवाणघेवाण कार्यक्रम:** अमेरिकेने अनेक शैक्षणिक देवाणघेवाण कार्यक्रमांद्वारे सॉफ्ट पॉवरचा वापर केला. गेल्या काही वर्षांमध्ये अमेरिकेत शिकणाऱ्या आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचा आकडा भरपूर प्रमाणात वाढला आहे.

**ब. आंतरजाल:** आंतरजालाद्वारे लोकशाही व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा प्रसार हा सुद्धा अमेरिकेच्या सॉफ्ट पॉवरचा भाग आहे.

**क. फूड चेन्स:** अमेरिकन फूड चेन्सला जागतिक ओळख लाभलेली आहे. मॅकडोनाल्ड, सबवे, पिझ्झा हट, बर्गर किंग इत्यादी याची काही उदाहरणे आहेत.

Sample Content

**क्लृप्ती**

**सॉफ्ट पॉवर**

- **संकल्पनेचे जनक:** अमेरिकन समाजशास्त्रज्ञ – जोसेफ नाय
- **संकल्पना:** सैन्य बळाचा वापर न करता दुसऱ्या देशावर प्रभाव टाकणे.
- **साधनांचा वापर:** आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व इतर साधनांचा वापर.
- **अमेरिकन सॉफ्ट पॉवरची उदाहरणे:**
  - अ. शैक्षणिक देवाण-घेवाण कार्यक्रम
  - ब. आंतरजाल
  - क. फूड चेन्स

**#४. संयुक्त राष्ट्रांच्या कंबोडिया व सोमालियाच्या मोहिमेतील भारताचे मानवतावादी कार्य स्पष्ट करा.**

**उत्तर:**

i. **संयुक्त राष्ट्रांचे कंबोडियातील संक्रमण प्राधिकरण UNTAC फेब्रुवारी १९९२ ते सप्टेंबर १९९३:** कंबोडियात **शांतता राखण्याकरता व मानवी हक्कांप्रती आदर निर्माण करण्याकरता भारततर्फे सैन्य आणि पोलीस दल** पाठवण्यात आले.

ii. याचबरोबर कायदा व सुव्यवस्था राखणे, मुक्त आणि न्याय्य निवडणुकांचे आयोजन, नागरी प्रशासन ही कार्ये हाती घेतली.

iii. संक्रमण काळात **कंबोडियन निर्वासितांचे प्रत्यवर्तन व पुनर्वसन** करण्यात देखील भारताने महत्त्वाची भूमिका बजावली.

iv. **संयुक्त राष्ट्रांची सोमालियातील मोहीम (UNOSOM – II) मार्च १९९३ ते डिसेंबर १९९४:** सोमालियातील संयुक्त राष्ट्रांच्या **अभियानात भारताने सक्रिय सहभाग नोंदवला** होता.

v. **संयुक्त राष्ट्रांच्या शांतिसेनेतील भारतीय तुकडीने यशस्वीरित्या मानवतावादी मदत** पुरवण्याचे काम केले, त्यांनी मोठ्या प्रमाणात विहिरी खोदल्या, शाळा आणि मशिदी बांधल्या, फिरते दवाखाने व मदत शिबिरांद्वारे वैद्यकीय व पशुवैद्यकीय सुविधा पुरवण्यात आल्या.

vi. याचबरोबर हजारो निर्वासितांचे पुनर्वसन करून त्यांच्या **प्रत्यवर्तनास साहाय्य** केले.

**५. दुसऱ्या महायुद्धानंतर विविध प्रादेशिक संघटना कशाप्रकारे एकत्र आल्या ते सांगा?**

**उत्तर:** या उत्तराकरता प्रश्न ५ मधील क्र. ५ चे उत्तर अभ्यासा.

**#६. 'शेंगेन प्रदेशाची निर्मिती ही युरोपीय संघाची सगळ्यांत मोठी कामगिरी मानली जाते' हे स्पष्ट करा.**

**उत्तर:**

i. शेंगेन करार हा १९८५ साली केला गेला. ज्याद्वारे सगळ्या सदस्य देशांमधील अंतर्गत सीमारेषा नष्ट करण्यात आल्या.

ii. फ्रान्स, जर्मनी, बेल्जियम, लक्झेंबर्ग आणि नेदरलँड या पाच युरोपिअन देशांनी या करारावर स्वाक्षऱ्या केल्या. हा करार लक्झेंबर्ग देशाच्या दक्षिणेकडील शेंगेन या खेडेगावात करण्यात आला.

iii. शेंगेन प्रदेशांतर्गत सीमा नाहीत.

iv. शेंगेन व्हिसा हा युरोपमध्ये सर्वत्र वापरला जाणारा व्हिसा आहे. शेंगेन व्हिसा पात्र व्यक्तींना २६ सहभागी देशांमध्ये मुक्तपणे प्रवास करण्याची परवानगी आहे. याचाच अर्थ युरोपातील प्रवाशांना शेंगेन सीमांवर तपासणी प्रक्रियांना सामोरे न जाता वेगवेगळ्या शेंगेन देशांमध्ये थेट प्रवेश मिळवता येईल.

v. या प्रदेशात युरोपीय संघाच्या सदस्यांबरोबरच सदस्य नसणारे व्यापारी आणि पर्यटक हेही एका देशातून दुसऱ्या देशात सहजरित्या व मोकळेपणाने प्रवास करू शकतात.

vi. एका देशांतून दुसऱ्या देशात जाताना त्यांना तपासणी आणि चौकशीला सामोरे जावे लागत नाही.

vii. सद्यस्थितीत युरोपीय संघातील २८ पैकी २२ देश शेंगेन प्रदेशाचा भाग आहेत.

**प्र.७. पुढील प्रश्नांची उत्तरे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे लिहा.**

**१. शीतयुद्धोत्तर काळातील सुधारणा स्पष्ट करा.**

**i. शीतयुद्धाचा शेवट आणि नव्या राष्ट्रांचा उदय**

**ii. एकध्रुवीयतेचा उदय**

**iii. मानवी हक्क आणि मानवतावादी हस्तक्षेप**

**iv. बहुध्रुवीयता आणि प्रादेशिकतावाद**

**उत्तर:** नोव्हेंबर १९८९ मध्ये बर्लिनची भिंत पडली आणि सोव्हिएट रशियाच्या विघटनाची सुरुवात होऊन अखेरीस शीतयुद्धाचा काळ समाप्त झाला. अशाप्रकारे अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांच्यामधील वर्चस्वाच्या लढाईवर आधारित पूर्व-पश्चिम वादही यामुळे संपुष्टात आले. शीतयुद्धोत्तर काळातील सुधारणांचा आढावा पुढील काही परिणामांद्वारे घेता येईल:

i. शीतयुद्धाच्या शेवटासोबत अमेरिका आणि सोव्हिएट रशिया या दोन महासत्तांनी व्यापलेली आंतरराष्ट्रीय व्यवस्था संपुष्टात आली. याच काळात सोव्हिएट रशियाचे विघटन होऊन नवीन राष्ट्रे उदयास आली.

Sample Content

ii. अमेरिका आणि सोव्हिएट रशिया यांच्यामधील शीतयुद्ध संपल्याने द्विध्रुवीयता संपुष्टात आली. पुढे अमेरिकेचे वर्चस्व असलेली एकध्रुवीय आंतरराष्ट्रीय व्यवस्था उदयास आली.

iii. मानवी हक्कांबाबतच्या जागरूकतेत वृद्धी झाली आणि मानवतावादी दृष्टिकोनातून झालेल्या हस्तक्षेपांमध्ये वाढ झाली.

iv. प्रश्न क्र. ४ मधील प्र. २ अभ्यासा.

***२. युरोपीय महासंघाबाबत पुढील मुद्द्यांच्या आधारे चर्चा करा.**

**i. इतिहास** **ii. युरोपिअन आयोग**
**iii. युरोपिअन संसद** **iv. युरोपिअन परिषद**
**v. युरोपिअन न्यायालय**

**उत्तर:**

i. १९८० च्या दशकात युरोपीय संघाची एक बाजारपेठ तयार करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू होऊन १९९३ मध्ये ती प्रक्रिया पूर्ण झाली. या कारणास्तव युरोपीय कोळसा आणि पोलाद समुदाय (ECSC) आणि युरोपीय आर्थिक समुदाय (EEC) या संघटना अनुक्रमे १९५१ व १९५७ साली स्थापन करण्यात आल्या. ७ फेब्रुवारी १९९२ रोजी ‘मास्त्रीक्त’ करार अंमलात येऊन युरोपीय संघाची (EU) ची स्थापना झाली. युरो हे येथील समान चलन होते. युरो (€) हे युरोपीय संघामधील २८ पैकी १९ देशांचे अधिकृत चलन आहे. या देशांना एकत्रितपणे, ‘युरोझोन’ म्हणून ओळखले जाते.

ii. हा आयोग युरोपिअन युनियनचा कार्यकारी नोकरशाहीशी संबंधित असा घटक आहे. युरोपिअन आयोग मुख्यत: नव्या कायद्यांसाठीचे प्रस्ताव सुचवणे, युरोपिअन संसदेने आणि आयोगाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी करणे या जबाबदाऱ्या पार पाडतो.

iii. युरोपीय संसदेत प्रत्यक्ष निवडणुकांद्वारे एकूण ७५१ सदस्य पाच वर्षांच्या कार्यकालासाठी निवडले जातात. संसदेवर कायदेविषयक, देखरेखीच्या आणि अर्थविषयक जबाबदाऱ्या सोपवल्या जातात.

iv. युरोपिअन परिषदेच्या रचनेत सदस्य राष्ट्रांचे राष्ट्राध्यक्ष किंवा प्रधानमंत्री, त्यांचे परराष्ट्र मंत्री व त्यासोबत परिषदेचे पूर्णवेळ अध्यक्ष यांचा समावेश असतो. ही परिषद वर्षातून चार वेळा भरवली जाते आणि युरोपिअन युनियनला सामरिक नेतृत्व प्रदान करते.

v. युरोपिअन न्यायालय युरोपिअन युनियनमधीय कायद्यांचा आणि करारांचा अर्थ लावणे व निवाडा करणे हे कार्य पार पाडते. युरोपिअन युनियनचे कायदे सदस्य देशांच्या राष्ट्रीय कायद्यांपेक्षा श्रेष्ठ मानले जातात.

**३. दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे जगातील प्रमुख प्रादेशिक संघटनांविषयी स्पष्टीकरण लिहा.**

**i. बीम्सटेक (BIMSTEC)** **ii. ब्रिक्स (BRICS)**
**iii. शांघाय सहकार्य संघटना (SCO)**
**iv. जी-२० (G-20)**

**उत्तर:**

i.

अ. **स्थापना:** ‘बे ऑफ बंगाल इनिशिएटिव्ह फॉर मल्टी सेक्टर टेक्निकल अँड इकॉनॉमिक को-ऑपरेशन’ म्हणजेच बीम्सटेकची स्थापना १९९७ मध्ये झाली.

ब. **सदस्यत्व:** बीम्सटेकमध्ये बंगालच्या उपसागरालगतच्या व इतर जवळच्या भागांमधील एकूण सात सदस्य देश सामील आहेत. त्यात दक्षिण आशियामधील बांगलादेश, भूटान, भारत, नेपाळ, श्रीलंका असे पाच देश तर आग्नेय आशियातील दोन देश, म्यानमार आणि थायलंड यांचा समावेश आहे.

क. **कार्य:** बीम्सटेक दक्षिण आशिया आणि आग्नेय आशिया या दोन प्रदेशांना जोडणारा दुवा आहे. वेगवान आर्थिक विकासाला चालना देणे आणि सर्वांच्या स्वारस्यांच्या विषयांवर सहकार्य घडवून आणणे हे बीम्सटेकचे प्रमुख कार्य आहे.

ii.

अ. **स्थापना:** ब्रिक्स ही संघटना २००९ साली ब्राझील, रशिया, भारत आणि चीन या उदयोन्मुख अर्थव्यवस्था असलेल्या देशाच्या पुढाकाराने आकारास आली.

ब. **सदस्यत्व:** ब्राझील, रशिया, भारत आणि चीन या मूळ सदस्यांमध्ये २०१० मध्ये दक्षिण आफ्रिकेचा समावेश करण्यात आला. ब्रिक्समधील सदस्य विकसनशील किंवा नवीन औद्योगिक देश म्हणून ओळखले जातात.

क. **कार्य:** मोठ्या व वेगाने वाढणाऱ्या या अर्थव्यवस्थांचा प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर बऱ्यापैकी प्रभाव असतो. ब्रिक्सचे सर्व सहभागी देश हे जी-२० चे सदस्य आहेत.

iii.

अ. **स्थापना:** शांघाय सहकार्य संघटना २००१ मध्ये चीन, रशिया, तसेच कझाकस्तान, किरगिझस्तान, ताजिकिस्तान आणि उझबेकिस्तान या रशियालगतच्या देशांनी एकत्र येऊन SCO संघटनेचे गठन केले.

ब. **सदस्यत्व:** संस्थापक सदस्यांव्यतिरिक्त २०१६ साली भारत आणि पाकिस्तान या संघटनेचे सदस्य झाले.

क. **कार्य:** गेल्या काही वर्षांत या संघटनेने दहशतवादाविरुद्ध सहकार्याच्या दिशेने महत्त्वाची पावले उचलली आहेत. राजकीय संवाद / चर्चा व आर्थिक सहकार्य यांद्वारे शांतता व स्थैर्य राखणे हे या संघटनेच्या प्रमुख उद्दिष्टांपैकी एक आहे. या व्यतिरिक्त व्यापार, संशोधन आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये सहकार्याला ही संघटना चालना देते.

Sample Content

iv.

अ. **स्थापना:** युरोपिअन युनियन आणि १९ इतर राष्ट्रांची सरकारे आणि मध्यवर्ती बँकांचे गर्व्हनर यांचे १९९९ मध्ये जी-२० नावाने आंतरराष्ट्रीय व्यासपीठ तयार करण्यात आले.

ब. **सदस्यत्व:** युरोपिअन युनियन आणि १९ इतर राष्ट्रांची सरकारे अमेरिका, ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, जपान यांसारखी विकसित राष्ट्रे जी-२० चे सभासद आहेत.

क. **कार्य:** आर्थिक स्थैर्याबाबत चर्चा करण्याच्या उद्देशाने जी-२० ची स्थापना करण्यात आली. २००८ पासून जी-२० चा शिखर परिषदांमध्ये राष्ट्रप्रमुख किंवा राष्ट्राध्यक्ष तसेच त्यांचे अर्थमंत्री आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री भाग घेताना दिसतात. विकसित आणि विकसनशील राष्ट्रांच्या दरम्यान चर्चा होण्यासाठी हे एक व्यासपीठ आहे. जी-२० मध्ये भारताने सातत्याने सक्रिय सहभाग घेतला आहे.


**[टीप:**
बिम्सटेक संघटनेची पार्श्वभूमी, रचना व कार्य अभ्यासण्याकरता शेजारील Q. R. Code स्कॅन करा.

ब्रिक्स संघटनेची पार्श्वभूमी, रचना व कार्य अभ्यासण्याकरता शेजारील Q. R. Code स्कॅन करा.

शांघाय सहकार्य संघटनेची पार्श्वभूमी, रचना व कार्य अभ्यासण्याकरता शेजारील Q. R. Code स्कॅन करा.

जी-२० (G-20) पार्श्वभूमी, रचना व कार्य अभ्यासण्याकरता शेजारील Q. R. Code स्कॅन करा.**]**

**प्र.८ खालील नकाशाचे निरीक्षण करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**




Sample Content

*i. **शेंगन क्षेत्रातील कोणत्याही चार देशांची नावे लिहा.**

**उत्तर:** ऑस्ट्रिया, बेल्जियम, चेक प्रजासत्ताक, डेन्मार्क, एस्टोनिया, फिनलंड, फ्रान्स, जर्मनी, ग्रीस, हंगेरी, आइसलँड, इटली, लाटव्हिया, लिथूआनिआ, लक्झेंबर्ग, नॉर्वे, पोलंड, पोर्तुगाल, स्लोव्हाकिया, स्लोवेनिया, स्पेन, स्वीडन, बल्गेरिया, सायप्रस, रूमानिया, क्रोएशिया आणि स्वित्झर्लंड.

[**टीप:** विद्यार्थ्यांनी वरील नावांपैकी कोणतीही चार नावे लिहिणे अपेक्षित आहे.]

*ii. **युरोपीय महासंघाचे सदस्य नसलेल्या मात्र शेंगेन क्षेत्रात असलेल्या कोणत्याही दोन देशांची नावे लिहा.**

**उत्तर:** बल्गेरिया, रूमानिया, स्वित्झ, नॉर्वे, क्रोएशिया, आइसलँड.

[**टीप:** विद्यार्थ्यांनी वरीलपैकी कोणतीही दोन नावे लिहिणे अपेक्षित आहे.]

## ज्ञानाचे उपयोजन

१. **तुम्ही शोधू शकता का?** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.७)
**चीनच्या वन बेल्ट वन रोड आणि चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडोर या योजना नक्की काय आहेत हे शोधा.**

**उत्तर:**

i. वन बेल्ट वन रोड ही युरेशियन राष्ट्रांमध्ये सहकार्य व सुसंवाद (दूरसंचार) टिकून राहावा या हेतूने याकरता तयार केलेली विकास योजना आहे. चीनचे नेते शी जीनपिंग यांनी ही योजना प्रकाशात आणली. ही योजना चीन आणि लँड सिल्क रोडला लागून असलेला प्रदेश यांमधील आर्थिक एकीकरणाला चालना देते.

ii. चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडोर ही चीनची योजना संपूर्ण पाकिस्तानात सद्यस्थितीत बांधकामांतर्गत असलेल्या पायाभूत सुविधांचा संग्रह आहे.

[**टीप:**

i. वन बेल्ट वन रोड या योजनेविषयक अधिक जाणून घेण्याकरता शेजारील Q. R. Code स्कॅन करा.

ii. चीन पाकिस्तान आर्थिक कॉरिडोर योजनेविषयक अधिक जाणून घेण्याकरता शेजारील Q. R. Code स्कॅन करा.]

२. **करून पहा.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.१०)
**युरोझोन राष्ट्रांची यादी तयार करा.**

**उत्तर:** ऑस्ट्रिया, बेल्जियम, सायप्रस, एस्टोनिया, फिनलंड, फ्रान्स, जर्मनी, ग्रीस, आयर्लंड, इटली, लाटव्हिया, लिथूआनिआ, लक्झेंबर्ग, माल्टा, द नेदरलँडस्, पोर्तुगाल, स्लोव्हाकिया, स्लोवेनिया आणि स्पेन.

३. **शोधा पाहू.** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.१०)
**युरोपीय संघाचे सदस्य देश कोणते?**

**उत्तर:** युरोपीय संघामध्ये एकूण २७ सदस्य देश आहेत. ते पुढीलप्रमाणे: ऑस्ट्रिया बेल्जियम, बल्गेरिया, क्रोएशिया, सायप्रस, चेक प्रजासत्ताक, डेन्मार्क, एस्टोनिया, फिनलंड, फ्रान्स, जर्मनी, ग्रीस, हंगेरी, आयर्लंड, इटली, लाटव्हिया, लिथूआनिआ, लक्झेंबर्ग, माल्टा, नेदरलँडस्, पोलंड, पोर्तुगाल, रूमानिया, स्लोव्हाकिया, स्लोवेनिया, स्पेन, स्वीडन.

४. **'ब्रेक्झिट' वर चर्चा करा. २०१६ साली ब्रिटिश नागरिकांनी जनमताद्वारे युरोपीय संघ सोडण्याचा निर्णय घेतला. शुक्रवार, दि.३१ जानेवारी २०२० च्या मध्यरात्री युनायटेड किंगडमने औपचारिकरित्या युरोपिअन युनियनचे सदस्यत्व समाप्त केले. या प्रक्रियेला 'ब्रेक्झिट' असे नाव दिले गेले. ब्रेक्झिट हे ब्रिटिश राष्ट्रवादाच्या बाजूने मांडलेले आग्रही मत आहे. राज्यसंस्था ही संकल्पना आजही आपले महत्त्व टिकवून आहे हे यातून सिद्ध होते. या अनुषंगाने पुढील प्रश्नांच्या आधारे वर्गात चर्चा घडवून आणा.**
**ब्रिटनला युरोपीय संघातून बाहेर का पडायचे होते?**
**ब्रेक्झिटच्या बाजूने दिलेला कौल जागतिकीकरणाच्या विरोधात आहे असे म्हणता येईल का?** (पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.११)

**उत्तर:** युरोपीय युनियनची लक्षणीय बाब म्हणजे युरोपातील राष्ट्रांमध्ये समृद्धी पसरवण्यात सुलभता निर्माण करणे ही होय. परंतु, इतर कोणत्याही संघटनेप्रमाणे, संघटनेतील कोणत्याही एका देशाचे दिवाळे निघाले किंवा त्याच्यावर आर्थिक संकट ओढावले असता इतरांनाही त्याचा भुर्दंड सोसावा लागतो. ब्रिटनला आर्थिक दृष्टीने श्रीमंत होण्याची इच्छा होती. त्याकरता कोणताही धोका त्यांना पत्करायचा नव्हता. २००० च्या मध्यावर युरोपीय युनियनमध्ये पूर्वी साम्यवादी असलेले अनेक देश होते आणि त्या देशांमधील लोक अत्यंत गरीब होते. तेथील अनेक नागरिकांनी युनायटेड किंगडम सारख्या समृद्ध देशांमध्ये स्थलांतर केले होते. जर ब्रिटनने 'ब्रेक्झिट' चा निर्णय घेतला असता, तर संपूर्ण युरोपीय युनियनमध्ये मोटारगाड्यांसारख्या उपयुक्त वस्तूंची विक्री करणे हे अधिक गुंतागुंतीचे झाले असते.

[**टीप:** ब्रेक्झिट (Brexit) विषयक माहिती मिळवण्याकरता शेजारील Q. R. Code स्कॅन करा.]

Sample Content

### उपक्रम

*१. **भारताचा ब्रिक्समधील सहभाग कोणता ते शोधा.**

**उत्तर:** भारताने इन्ट्रा-ब्रिक्स ट्रेडला प्रोत्साहन दिले म्हणजेच युरोपऐवजी परस्परांकडून वस्तूंची आयात करण्याची बाब सदस्य राष्ट्रांच्या निदर्शनास आणून दिली. भारत कोणत्याही सदस्य राष्ट्रांच्या रुचीला धक्का पोहोचवणारा प्रस्ताव किंवा कृती करण्यापासून नेहमी मागे हटला. दक्षिण आफ्रिका आणि ब्राझिलमधील औद्योगिक पाया नूतनीकृत करण्यासाठी भारताने न्यू डेव्हलपमेंट बँकेला (ब्रिक्सची बँक) ७००० कोटी रुपयांचा हातभार लावला.

[**टीप:** ब्रिक्सविषयक अधिक माहिती मिळवण्याकरता शेजारील Q. R. Code स्कॅन करा.]

## सराव चाचणी

**वेळ: १ तास** **एकूण गुण: २५**

**प्र.१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.** **[४]**

१. ११ सप्टेंबर २००१ ला अमेरिकेविरुद्ध झालेल्या हल्ल्यानंतर (ज्याला ९/११ हल्ला म्हणून ओळखले जाते) याचे स्वरूप बदलत गेले:
(अ) मुत्सद्देगिरीचे (ब) दहशतवादाचे (क) राजकारणाचे (ड) आंतरराष्ट्रीय संबंधांचे

२. 'इतिहासाचा अंत' हा सिद्धान्त मांडणारे अमेरिकन राजकीय भाष्यकार.
(अ) मेडिसीन्स सान्स (ब) जोसेफ नाय (क) जॉर्ज एच. बुश (ड) फ्रान्सिस फुकुयामा

३. 'मास्त्रीक्त' करार संदर्भ:
(अ) संयुक्त राष्ट्र शांतता रक्षक दल (ब) युरोपीय संघ
(क) अमेरिकेचा कुवेतमध्ये हस्तक्षेप (ड) ब्रिक्सची स्थापना

४. जकात आणि कोटा हे _______ प्रमुख प्रकार आहेत.
(अ) व्यापारातील अडथळ्यांचे (ब) धोरणांचे (क) आर्थिक हितसंबंधांचे (ड) विशेष करारांचे

**(ब) गटात न बसणारा शब्द ओळखा.** **[३]**

१. माँटेनिग्रो, लिथूआनिया, जॉर्जिया, अँझरबैजान
२. स्लोवेनिया, सर्बिया, कझाकस्तान, उत्तर मेसिडोनिया
३. सार्क, शांघाय सहकार्य संघटना, युरोझोन, बीम्सटेक

**प्र.२. खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा. (कोणतेही एक)** **[२]**

१. चीनने जगात प्रबळ स्थान प्राप्त केले.
२. १९८० च्या दशकाला मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणतात.

**प्र.३. सहसंबंध स्पष्ट करा. (कोणतेही एक)** **[३]**

१. प्रादेशिकवाद आणि बहुध्रुवीयता २. पारंपरिक दहशतवाद आणि आधुनिक दहशतवाद

**प्र.४. आपले मत नोंदवा. (कोणतेही दोन)** **[८]**

१. मानवतावादी हस्तक्षेप २. युरो हे युरोझोनचे अधिकृत चलन आहे.
३. आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रादेशिकवाद

**प्र.५. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही एक)** **[५]**

१. 'वांशिक अस्मितेवर आधारित स्वतंत्र राष्ट्र निर्मितीच्या मागण्यातून नव्या राष्ट्रांचा उदय झाला' हे स्पष्ट करा.
२. 'New World Order' ही संज्ञा आणि तिचा जागतिक पातळीवरील राजकारणावर पडलेला प्रभाव स्पष्ट करा.

सराव चाचणीची उत्तरे पाहण्याकरता विद्यार्थ्यांनी सोबत दिलेला **Q.R. Code** स्कॅन करावा.

Sample content

## AVAILABLE NOTES FOR STD. XI & XII:

### SCIENCE

**Perfect Series:**

For students who want to excel in board exams and simultaneously study for entrance exams.

- Physics Vol. I
- Physics Vol. II
- Chemistry Vol. I
- Chemistry Vol. II
- Mathematics & Statistics Part - I
- Mathematics & Statistics Part - II
- Biology Vol. I
- Biology Vol. II

**Precise Series:**

For students who want to excel in board exams.

- Physics
- Chemistry
- Biology

**Additional Books for Std. XII Sci. & Com.:**

- A collection of Board Questions (PCMB)
- A collection of Board Questions with solutions (PCMB)
- 20 Model Question Papers with solutions (PCMB & E)
- Solution to HSC Board Question Bank (Science)
- Solution to HSC Board Question Bank (Commerce)

### COMMERCE (ENG. & MAR. MED.)

**Smart Notes:**

- Book-Keeping and Accountancy
- Book Keeping and Accountancy (Practice)
- Economics
- Organisation of Commerce and Management
- Secretarial Practice
- Mathematics and Statistics - I
- Mathematics and Statistics - II
- Supplementary Questions (BK • ECO • OCM • SP)

### ARTS (ENG. & MAR. MED.)

- History
- Geography
- Political Science
- Psychology
- Sociology

**Languages:**

- English Yuvakbharati
- Hindi Yuvakbharati
- Marathi Yuvakbharati

Books available for MHT-CET, NEET & JEE




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

### OUR PRODUCT RANGE

Children Books | School Section | Junior College
Degree College | Entrance Exams | Stationery

Visit Our Website




Explore our range of STATIONERY

Marketed by:

Target Publications® Pvt. Ltd.
Transforming lives through learning.

**Address:** 2nd floor, Aroto Industrial Premises CHS, Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road, Mulund (W), Mumbai 400 080
**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15 • **Website:** www.targetpublications.org • **Email:** mail@targetpublications.org